नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित (रजी .एफ .१५६२)

# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब

ता .दारव्हा जि .यवतमाळ (मवि सांकेतांक ४३४)

**(Accredited by NAAC with "B" grade with CGPA of 2.13 )**

संस्थापक अध्यक्ष
**मा.आ. श्री. माणिकरावजी ठाकरे**

www.accboriarab.org.in
(फोन नं. ०७२३८—२५६३४१/९९२१५५६३६७)

प्राचार्य
**डॉ. केशवराव फाले**
मो.9960422792

जा.क्र. — कवाम/४३४/......./२० २१

दिनांक : ०९/०८/२०२१

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने '९ ऑगस्ट क्रांतीदिन' साजरा

बोरीअरब : स्थानिक कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व प्राचार्य डॉ. केशवराव फाले यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९ ऑगस्ट, २०२१ रोजी आभासी पद्धतीने (ऑनलाईन) 'क्रांतीदिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता प्रा. प्रशांत जवादे, इंदिरा महाविद्यालय, कळंब प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशवराव फाले हे उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शनात सुरूवातीला प्रा. जवादे यांनी स्वातंत्र्य लढयाची मशाल पेटवत देशातून इंग्रजी राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देण्याऱ्या तमाम क्रांतीवीरांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी स्त्रीशक्तीचे महत्त्व विशद केले. क्रांतीची सुरूवात एका स्त्रीने केली. यानिमित्ताने स्त्रीचेतना जागृतीचे आवाहनही विद्यार्थ्यांना केले. याकरिता त्यांनी अरूणा असफल्ली या स्वातंत्र्य सेनानीचे उदाहरण विद्यार्थ्यासमोर ठेवले. इंग्रजाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाचे बलिदान दिले, त्यांना आठवण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट, अर्थात 'क्रांती दिन'! तसेच ९ ऑगस्ट हा दिवस म्हणजे आदिवासी दिन व ग्रंथालयाचे जनक डॉ. रंगनाथन यांचा जन्मदिन अशा तिहेरी दृष्टीने महत्त्व असणाऱ्या या दिवसाचे मर्म त्यांनी आपल्या भाषणातून उलगडून दाखविले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. केशवराव फाले यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात ९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आपल्या ओघवत्या शैलीमध्ये विशद केले. तसेच सद्य:स्थितीमध्ये (कोरोनाकाळ) रासेयो स्वयंसेवकांची जबाबदारी काय असली पाहिजे याची जाणीव स्वयंसेवकांना करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. नंदकुमार भाकरे यांनी तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश तेलगोटे यांनी केले. या आभासीपद्धतीने आयोजीत कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्रति,
**मा. संपादक ,**
दैनिक ——————————
यवतमाळ आवृत्ती.

महोदय,

वरील आशयाची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध करून उपकृत करावे ही विनंती.

आपला.